**अर्जदारतर्फे साक्षीदार क्र. १**

**<u>फौ.कि.अ.क्र. १७३/२०२४</u>**
खुशबु वि. कृष्णकुमार
**नि.क्र. २५ खाली**

**<u>निशाणी ३१ वरील आदेशानुसार सामनेवाला तर्फे अर्जदाराचे साक्षीदार क्र. ०१ चे उलटतपास</u>**

**<u>सामनेवाला तर्फे विधीज्ञ श्री. सी. बी. बागडे यांच्यामार्फत उलटपासः-</u>**

**११.** मी पदवीधर आहे आणि माझ्या कडे बी.एस. सी. ची डिग्री आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नाच्या वेळी मला सामनेवाला तर्फे दागीने मिळालेले होते. साक्षीदार स्वतःहून सांगिते की परंतु सामनेवाल्याने ते परत घेतले. हे म्हणणे खरे नाही की, मी सर्व दागदागिने माझ्या माहेरी घेउन गेले. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर मी सामनेवाला क्र. १ सोबत त्यांच्या एकत्र कुटुंबात नांदण्यास गेले. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर मी सामनेवाला क्र. १ कडे एकत्र कुटुंबापासून विभक्त राहण्याची मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मागण्यानुसार मला सामनेवाल्याने इंदौर येथे राहण्यास घेउन गेले. हे म्हणणे खरे नाही की, इंदौर येथे गेल्यानंतर मी माझ्या आई वडीलांकडे परत जाण्यासाठी आग्रह करत होते. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला मला माहेरी जाण्यची परवानगी देत होता. हे म्हणणे खरे नाही की, हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाल्याने मला फोनवरती बोलतांना ऐकले की, मी आई वडीलांच्या दबावात येउन सामनेवाल्याशी लग्न केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फोनवरती वरील वाक्य बोलले होते.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र. १ सोबत २०२३ मध्ये वादविवाद झल्यानंतर मी माझ्या भावासोबत माहेरी निघून गेले. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी थोडे दिवस माहेरी राहिले. हे म्हणणे खरे आहे की, त्या कालावधीत मी सामनेवाला व त्याच्या आई वडीलांविरुध्द कौटुंबिक हिंसाचार ची तक्रार याच न्यायालयात दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला आणि माझ्या मध्ये तडजोड होउन मी त्याच्या सोबत नांदायला परत गेली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सांगण्यावरुन सामनेवाला आणि मी मुंबई येथे फिरण्यासाठी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, गर्भवती असतांना सामनेवाल्याने माझे पूर्णपणे औषधोपचाराची काळजी घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवाल्याकडे सोने आणि प्लॉटची मागणी केली. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला हा मजुरी करतो. हे म्हणणे खरे नाही की, सोने आणि प्लॉट खरेदी करण्याची सानेवाल्याची ऐपत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सोने, चांदी व प्लॉट घेण्याची सामनेवाल्याची ऐपत नसल्यामुळे मी त्याच्याकडे माहेरी जाण्याचे हट्ट केले. हे म्हणणे खरे नाही की, मागणी केल्यावेळी सामनेवाल्याने मला समजवले की, मी गर्भवती आहे आणि माझ्या माहेरी डॉक्टर नाही, इकडे चांगला इलाज होउ शकतो.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, माझी मागणी पूर्ण न झल्यामुळे मी माझ्या भावाला बोलावून स्वतःहून सामनेवाल्याच्या घरातून निघून गेले. हे म्हणणे खरे नाही की, स्वतःहून सामनेवाल्याचे त्याग करुन मी सामनेवाल्या विरुध्द प्रस्तुतचा खोटा केस दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला हा चैत्राम हॉस्पीटल मध्ये काम करत असून त्यास दरमहा ७५,०००/– रुपये पगार मिळतो असे मी माझ्या सरतपासणीच्या शपथपत्रामध्ये खोटे उल्लेखीत केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासणीच्या शपथपत्रामध्ये उल्लेखीत आरोपी विरुध्द सर्व आरोप खोटे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात उपस्थित राहून शपथेवरती खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2025.12.16 17:39:18 -0500

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड

**दिनांकः १६/१२/२०२५.**

माझे समक्ष,

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2025.12.16 17:39:13 -0500

(रोहन विजयकुमार थाईल)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
नरखेड, नागपूर.

**दिनांकः १६/१२/२०२५**